वाचा:- महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७
वाचा:- ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडिल पत्र क्र. अराप-११०३/प्र.क्र.३८२/आस्था-९ दि.०३डिसेंबर २००३
वाचा:- महाराष्ट्र शासन सामाजिक न्या.सांस्कृतीक कार्य,व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडील शासन निर्णय क्र. सीबीसी-१०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५, दिनांक २८ जानेवारी,२००४
वाचा:- ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:एपिटी-५०१६/प्र.क्र.४५/आस्था-८/दिनांक २२ जुलै,२०१६
वाचा:- मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कडिल पत्र क्र. जाक्र विकास/कार्या-२/सेभ/प्र.क्र.४९३६/२०१६ दि. २९/११/२०१६
वाचा:- दिनांक ०२/१२/२०१६ रोजी झालेल्या पदोन्नती निवड समिती सभेचे इतिवृत्त.
वाचा:- कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक ०५/१२/२०१६

---

जाक्र.पाजिप/साप्रवि/आस्था-३ अ/ वशी/ ५८९ /१६
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद पालघर
दिनांक: ०५/१२/२०१६

## आदेश

दिनांक ०२/१२/२०१६ रोजी झालेल्या पदोन्नती निवड समिती सभेच्या इतिवृत्तानुसार पालघर जिल्हा परिषद सेवेतील कनिष्ठ प्रशासन अधिकारी जिल्हा सेवा वर्ग-३ यांना सहाय्यक प्रशासन अधिकारी जिल्हा सेवा (वर्ग-३) या पदावर सुधारीतय वेतन श्रेणी (पीबी-२) वेतन ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३०० मध्ये पदोन्नतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | प्रवर्ग | निवड केलेला प्रवर्ग | सद्याचे ठिकाण | पदोन्नतीने दिलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. रघुनाथ के.गरेल | अनु.जमाती | खुला | पं.स.मोखाडा | पं.स.जव्हार |
| २ | श्री. दिनानाथ आ.पाटील | इ.मा.व. | खुला | ग्रा.पं.विभाग जि.प. पालघर | महिला व बालकल्याण पालघर |
| ३ | श्री. बाळकृष्ण का. भोईर | अनु.जाती | अनु.जाती | बांधकाम विभाग, जि.प.पालघर | शिक्षण विभाग (प्राथ) |

**पदोन्नतीच्या अटी व शर्ती**

१) सदरची पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची तदर्थ असून सहाय्यक प्रशासन अधिकारी संवर्गातील एकूण पदोन्नतीची रिक्त पदे व या संवर्गातील काही कर्मचारी प्रतिनियुक्तीने अन्य विभागात कार्यरत असल्यामुळे रिक्त असलेली जिल्हा परिषदेतील पदे विचारात घेऊन ही पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यामुळे कोणताही प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी जिल्हा परिषद संवर्गात परत आल्यास/हजर झाल्यास कनिष्ठतम कर्मचाऱ्यास पदावनत करण्यात येईल.
२) वरील कर्मचाऱ्यानी पदोन्नतीचे ठिकाणी दिनांक १३/१२/२०१६ पर्यंत हजर व्हावयाचे आहे अन्यथा दिनांक १४/१२/२०१६ रोजी सदर आदेश रद्द समजण्यातय येवून पुढील सेवाजेष्ठतेनुसार पात्र कर्मचाऱ्यांला पदोन्नती देण्यात येईल.
३) शासन वेळोवेळी आदेश देईल अशा सदर पदाकरीता आवश्यक असलेली अर्हता धारण करावी लागेल.
४) वरील कर्मचारी यांनी त्यांचा वेतन निश्चिती संबंधिचा विकल्प सहाय्यक प्रशासन अधिकारी या पदावर हजर झाल्याच्या दिनांकापासून एक महाच्या आत द्यावयाचा आहे. विकल्प मुदतीत न दिल्यास त्यांची वेतन निश्चिती म.ना.से.(वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(१)(अ) खाली करण्यात येईल.
५) शासनाचे नियमान्वये वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती संबंधित कर्मचाऱ्यांना लागू राहतील.

निधी चौधरी(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

प्रती:- श्री/श्रीम...........................................कनिष्ठ प्रशासन अधिकारी ............यांना .......... यांचेमार्फत.
प्रत:-खातेप्रमुख...........................................यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी.
प्रत :- कार्यालयीन नस्ती

निधी चौधरी(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर